साप्ताहिक

# परळी परिसर

* परळी वैजनाथ * सोमवार, दि. २२ एप्रिल २०२४ * पाने-४ * ₹ २/- www.parliparisar.com

शालेय स्टेशनरी व विविध प्रकारच्या आकर्षक छपाईसाठी...
न्यू सुधांशू प्रिंटर्स
श्रीनाथ चित्रमंदिरच्या मागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, Mob.9881244075
कापडी पिशव्या छापून मिळतील.

# लोकसभेची ही निवडणूक परळीच्या राजकारणाची दिशा बदलणारी..?

बीड जिल्ह्यात परळी वैजनाथ विधानसभा मतदार संघाची निर्मिती झाल्यानंतर पहिल्या आमदार व येथील पहिल्या महिला आमदार होण्याचा त्याच बरोबर येथून सलग दोन वेळा विधानसभेवर निवडून येण्याचा मान मिळवणाऱ्या भारतीय जनता पक्षाच्या जेष्ठ नेत्या व महायुतीच्या बीड लोकसभेच्या विद्यमान उमेदवार पंकजाताई मुंडे यांना राष्ट्रवादी काँग्रेसचा (अजित पवार गट) बालेकिल्ला म्हणून ओळख असलेल्या परळी मतदार संघात विद्यमान आमदार व जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांची मिळालेली भक्कम राजकीय साथ या निवडणुकीत मोठी फायद्याची ठरणार आहे.

गेल्या विधानसभेच्या निवडणुकीत श्री धनंजय मुंडे यांच्याकडून येथे झालेल्या मोठ्या पराभवामुळे भाजपला मोठा धक्का बसला. पंकजाताई तीव्र नाराज झाल्या. पराभवाच्या या धक्क्यातून त्या अनेक दिवस बाहेर आल्याच नाहीत. त्यांची नाराजी, उदासिनता व शांत राहण्याच्या भूमिकेचा फायदा येथे विरोधी पक्षाला झाला.



त्यातच त्यांचा कमी झालेला संपर्क, दूरावलेले कार्यकर्ते याचा मोठा फायदा तत्कालीन परिस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेसने घेवून मतदार संघात झालेल्या विविध निवडणुकीत एका मागून एक यश हा पक्ष मिळवत गेला. कार्यकर्त्यांचे संख्याबळ, मानणारा मोठा सर्वसामान्य नागरिक, सरकारकडून येथे खेचून आणलेली विविध विकासकामे, विकासकामाबरोबरच विविध योजनांसाठी येणारा निधी यामुळे येथे आमदार धनंजय मुंडे यांची ताकत वाढली. परळी हा मतदार संघ राष्ट्रवादीचा बालेकिल्ला म्हणून राज्याच्या राजकारणात ओळखला जाऊ लागला.

*** निवडणूक वार्तापत्र ***
**लक्ष्मण वाकडे**
**परळी वैजनाथ.**

डॉ.प्रितमताई मुंडे सलग दोन वेळा मोठ्या विक्रमी मतांनी लोकसभेवर जिल्ह्यातून निवडून गेल्या. दिल्लीत गेल्या दहा वर्षापासून भाजपची एकहाती सत्ता आहे. आता राज्यातही सत्ता आहे. या संधीचा फायदा भाजपला येथे घेता आला नाही. एकही मोठा प्रकल्प येथे त्यांना आणता आला नाही की मोठ्या विकास योजना ते परळीसह जिल्ह्यात कार्यान्वित करु शकले नाहीत. नगर-बीड-परळी रेल्वे मार्गाच्या कामाला मागच्या दहा वर्षात भाजपला म्हणावी तशी गतीही देता आली नाही. आता लोकसभा निवडणुकीत विद्यमान खासदार डॉ.प्रितमताई मुंडे यांना डावलणे या व इतर कारणांमुळे परळी विधानसभा मतदार संघात आणि जिल्ह्यातही भाजप बॅकफूटवर गेलेली आहे.



महायुतीमुळे इथला राजकीय संघर्ष कमी झाला आहे. परिणामी या लोकसभा निवडणुकीत पालकमंत्री धनंजय मुंडे यांची भक्कम साथ भाजपला म्हणजेच महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांना मिळाली आहे. पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या पक्षाचे कार्यकर्ते, नेते कामाला लागले आहेत. बैठका सभा होत आहेत. प्रचारफेऱ्यांचा धडाका गल्लीबोळात, गाव, वाडी वस्त्यांवर सुरू झाला आहे. प्रचारात भाजप पेक्षा पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या कार्यकर्त्यांनी आघाडी घेतली आहे.

दरम्यान, या निवडणुकीत जिल्ह्याच्या विकास प्रश्नापेक्षा जातीचे राजकारण तीव्र झालेले आहे. सोशलमिडियातून ते ढवळून निघत आहे. बदलेल्या या राजकारणामुळे सर्वसामान्य माणूस राजकारणापासून दूरावला आहे. या परिस्थितीत महायुतीला मोठे मताधिक्य मिळवून देण्यासाठी पालकमंत्री धनंजय मुंडे मोठे परिश्रम घेत आहेत. महायुतीचा उमेदवार बीड लोकसभेतून निवडून आणल्यास मंत्री धनंजय मुंडे यांचा मोठा फायदा होणार आहे. महायुतीत त्यांची ताकत वाढणार आहे. पंकजाताईचा विजनवास संपणार आहे. आगामी काळात होणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीसाठी त्यांचा दावा रहाणार नाही. या निवडणुकीसाठी श्री मुंडे यांच्या विरोधात परळीत तगडा उमेदवार असणार नाही. आगामी परळी पालिकेच्या तसेच जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकीतही याचा मोठा फायदा श्री मुंडे यांना येथे होणार आहे. त्यामुळे लोकसभेची होऊ घातलेली ही निवडणूक परळीसह जिल्ह्याच्या राजकारणाची दिशा बदलणारी असणार आहे. ***

# मतदानाचा टक्का वाढवावा-जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंडे

बीड (जीमाका): मतदान करणे हा आपला हक्क आहे. ३९ बीड लोकसभा मतदारसंघात सोमवार दिनांक १३ मे रोजी मतदान आहे. या दिवशी मतदानाचा हक्क बजावून आपल्या मतदारसंघातील मतदानाचा टक्का वाढवावा, असे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी केले.

रविवारी जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात ३९ बीड मतदारसंघातील मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी विविध विभागांची बैठक आयोजित केली, यावेळी त्या संबोधित करीत होत्या. याबैठकीस जिल्हा परिषदेच्या प्रकल्प संचालक संगीता देवी पाटील, उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्रकुमार कांबळे, स्वीपचे नोडल अधिकारी डॉ. विक्रम सारूक उपस्थित होते. जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी आपापल्या स्तरावरून प्रत्येकांनी चौथ्या टप्प्यात १३ मे रोजी बीड लोकसभा मतदार संघात होणाऱ्या मतदानाच्या दिवशी मतदानाचा टक्का वाढविण्याचे आवाहन करून, स्वतः मतदान करणे आणि इतरांना मतदान करण्यासाठी जागरूक करणे हे आपले नैतिक कर्तव्य असून ते पार पाडावे असे, त्या यावेळी म्हणाल्या. यासह आपण सर्व शासनाचा भाग आहोत. निवडणुकीच्या एकूण प्रक्रियेमध्ये विविध जबाबदारी आपण पार पाडत आहोत. त्यामुळे मतदानाचा प्रचार प्रसार करणे हे आपले आद्य कर्तव्य असल्याचेही त्यांनी यावेळी आग्रहपूर्वक सांगितले. मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी सूक्ष्म नियोजन करण्याचे निर्देश यावेळी त्यांनी दिले.

याप्रसंगी पोस्ट ऑफिस, राष्ट्रीय तसेच मान्यताप्राप्त बँक, राज्य परिवहन महामंडळ, आरटीओ, एलआयसी यांनी त्यांच्या कार्यालयात बॅनर, सेल्फी पॉईंट, स्टॅम्प च्या माध्यमातून ३९ बीड मतदारसंघात १३ मे रोजी होणाऱ्या निवडणुकी विषयक ग्राहकांमध्ये करीत असलेल्या प्रचार प्रसारबद्दलची माहिती संबधित कर्मचाऱ्यांनी दिली.

जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शिक्षण विभागाने विद्यार्थ्यांमध्ये मतदान जागृती मोहीम राबवित आहेत. याअंतर्गत रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, मतदारांना जागृत करण्याची शपथ, मतदान करण्याचे आग्रहाचे निमंत्रण, प्रभात फेरी, आई-वडिलांना पोस्टकार्डने पत्र लिहून मतदानासाठी प्रवृत्त करने. असे नाविन्यपूर्ण उपक्रम सुरू असल्याची माहिती गट शिक्षणाधिकारी गजानन सोनवणे यांनी दिली. यासह शासनाच्यावतीने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने 'सेल्फी विथ सिग्नेचर' ही यशस्वी मोहीम राबवली गेली. आकाशवाणीवर जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी, पोलीस अधीक्षक, स्वीप नोडल अधिकारी यांच्या मुलाखती येत्या काळात प्रसारित होणार आहेत, माहिती कार्यालयाच्यावतीने फेसबुक, एक्सच्या माध्यमातून मतदान जागृती केली जात असल्याची, माहिती अधिकारी अंजू निमसरकर यांनी सांगितले.

यासह येत्या काही दिवसात जिल्ह्यात मतदानाचा प्रचार प्रसार करण्यासाठी 'मेगा इव्हेंट्स' आयोजित केले या अंतर्गत सायक्लोथॉन, मानवी साखळी असे उपक्रम राबवण्यात येतील असल्याचे स्वीपचे नोडल अधिकारी डॉ.सारूक यांनी सांगितले.

मतदानाच्या दिवशी बीड जिल्ह्यात स्तनदा माता तसेच गरोदर महिलांसाठी विशेष व्यवस्था केली जाईल. या अंतर्गत मतदानाच्या ठिकाणी तात्पुरती अंगणवाड्या तयार करून लहान बालकांना खेळणी तसेच मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिले जातील. या ठिकाणी स्तनदा माता तसेच गरोदर महिला त्यांचा मतदानाचा क्रमांक येईपर्यंत येथे थांबू शकतील, अशी माहिती प्रकल्प संचालक श्रीमती पाटील यांनी दिली.

मतदान करणे हा नागरिकांचा हक्क आहे यासाठी मतदारांनी मतदारांमध्ये प्रचार प्रसार करण्यासाठी विविध समाज माध्यमांचा वापर करावा. यामध्ये मोबाईलवर डी.पी., स्टेटस, रिल्स, फेसबुक, शॉर्ट, इंस्टाग्राम या आणि अन्य समाज माध्यमांचा उपयोग करून सोमवार दिनांक १३ मे २०२४ रोजी मतदानाच्या हक्क बजावण्याचा प्रचार प्रसार करावा असे, आवाहन, जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी आज केले. ***

## परळी येथील खांडीनाला, सरस्वती नदी बनली 'गटारगंगा'

परळी वैजनाथ, (जिमाका):- बारा ज्योतिर्लिंगापैकी पाचवे ज्योतिर्लिंग असलेल्या प्रभू वैद्यनाथाच्या पौराणिक कथांमध्ये मोठे धार्मिक महत्व असलेली शहरातून वाहणारी सरस्वती ही गाव नदी तसेच शहरातून वाहणारा खांडीनाला गटार गंगा होवून बसला आहे. दुर्गंधी, डास, माशा या सामना नदीपत्राच्या परिसरात राहणाऱ्या नागरिकांना करावा लागते आहे. याकडे परळी पालिकेचे दुर्लक्ष आहे.

मृत झालेल्या मोकाट जनावरांच्या मृतदेहांची व कचऱ्याची विल्हेवाट लावण्याचे ठिकाण नाला व नदी बनली आहे. कुजलेल्या जनावरांच्या दुर्गंधीचा नदी शेजारी असलेल्या नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. परळी शहराच्या दक्षिणेतील डोंगरातून उगम पावलेल्या सरस्वती नदीचे धार्मिकदृष्ट्या मोठे महत्व आहे. पाच वर्षापुर्वीच या नदीचे खोलीकरण करुन पाणी स्वच्छ करुन पुन्हा वापरण्याचा प्रस्ताव अद्याप धुळखात पडून आहे. मागील दीड वर्षापासून परळी नगरपालिकेवर प्रशासक असल्याने शहरातील स्वच्छतेकडे लक्ष देणारे जबाबदार पदाधिकारी नाहीत. स्वच्छतेसाठी महिन्याला लाखो रुपये खर्च करण्यात येत असताना शहरात बेवारसपणे मृत झालेले डुक्कर, कुत्रे असे प्राणी हे कचऱ्यासोबत खांडीनाला, सरस्वती नदी पात्रात टाकतात. यामुळे हा नाला व नदी परिसरात राहणाऱ्या नागरिकांना दुर्गंधाचा मोठा सामना करावा लागतो आहे.

नाथ चित्र मंदिर परिसर, माणिक नगर, सिद्धार्थनगर तसेच अंबेवेस ते गोपाल टॉकीज परिसरातील रहिवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. यामुळे या भागात रोगराईला निमंत्रण मिळत आहे. परळी पालिकेने याकडे त्वरित लक्ष द्यावे अशी मागणी नागरिकांनी होत आहे.**

## ईव्हीएम मशिन हाताळणी प्रशिक्षण

परळी वैजनाथ, (बातमीदार):- येत्या १३ मे ला होणाऱ्या बीड लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदान केंद्राध्यक्ष व सहाय्यक मतदान अधिकारी यांना मतदान यंत्र (ईव्हीएम) हाताळणी प्रशिक्षण देण्याचे काम परळी येथील तहसील कार्यालयात २३ ते ३० एप्रिल या कालावधीत सकाळी १० ते सायं.५ या वेळात होणार आहे याचा लाभ संबंधितांनी घ्यावा असे आवाहन केले आहे. **

# नागरीकांनी निर्भयपणे मतदान करावे-उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर

परळी वैजनाथ (प्रतिनिधी):- नागरीकांनी निर्भयपणे आपला मतदानाच्या अधिकाराचा वापर करून मतदान करावे असे प्रतिपादन उपविभागीय अधिकारी श्री.लाटकर, नागरीकांनी मतदानरुपी राष्ट्रीय कर्तव्य पारपाडावे असे विचार तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांनी व्यक्त केले. तर जास्तीत जास्त मतदारांनी निर्भयपणे मतदान करावे गटशिक्षणाधिकारी श्रीराम कनाके यांनी म्हटले. ३९ बीड लोकसभा निवडणुकीचे मतदान १३ मे रोजी पारपडत असून या पार्श्वभूमीवर मतदान जनजागृती रॅलीच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते.

तालुका स्वीप कक्ष अंतर्गत लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभाग, तहसील कार्यालय, गटशिक्षणाधिकारी कार्यालयाच्या संयुक्त विद्यमाने मतदार जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. रॅलीचे उद्घाटन उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, तहसीलदार व्यंकटेश मुंडे, नायब तहसीलदार बाबूराव रुपनर, गटशिक्षणाधिकारी श्रीराम कनाके, संस्थेचे कोषाध्यक्ष प्रा प्रसाद देशमुख, महिला महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ विद्या देशपांडे यांच्या उपस्थितीत करण्यात




आले. रॅलीची सुरुवात लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयाच्या प्रांगणातून करण्यात आली, पुढे राणी लक्ष्मीबाई टॉवर चौक मार्गे स्टेशन रस्ता, मार्केट कमिटी, सुभाष रस्ता, रोडे चौकातून महिला महाविद्यालयात संपन्न झाली. यावेळी लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय, मिलिंद उच्च माध्यमिक विद्यालय, कृष्णाबाई देशमुख विद्यालय, जिल्हा परिषद मुलांची, जिल्हा परिषद कन्या शाळा आदि शाळेसह शिक्षक, प्राध्यापक, स्वीपचे कर्मचारी, तहसीलचे कर्मचारी, गटशिक्षणाधिकारी कार्यालयाचे कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी विद्यार्थ्यांनी मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो, वाढवू तिरंग्याची शान, करुया देशासाठी मतदान, भारत माता की जय आदि घोषणांनी परिसर दणाणून गेला. उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, तहसीलदार व्यंकटेश मुंडे, नायब तहसीलदार बाबूराव रुपनर, श्रीराम कनाके यांनी रॅली मार्गावर नागरीकांना माहिती पत्रक देत मतदान करण्याचे आवाहन केले. रॅलीच्या समारोपात गटशिक्षणाधिकारी श्रीराम कनाके यांनी रॅलीत सहभागी झालेल्या सर्वांचे आभार मानत जास्तीत जास्त मतदारांनी मतदान करावे असे आवाहन केले. कार्यक्रमाचे संचलन शाम आघाव यांनी तर आभार प्रा.प्रविण फुटके यांनी मानले. रॅलीस तालुका स्वीप कक्षाचे सहकार्य लाभले. ***

# पं.अतुलशास्त्री भगरे गुरुजी यांनी घेतले ज्योतिर्लिंग वैद्यनाथाचे दर्शन

परळी वैजनाथ (प्रतिनिधी):- भागवत भूषण तथा सुप्रसिद्ध ज्योतिषाचार्य प.अतुलशास्त्री भगरे गुरुजी यांनी शुक्रवार दि.१९ रोजी देशातील पाचवे ज्योतिर्लिंग असलेल्या प्रभू वैद्यनाथांचे दर्शन घेतले.यावेळी त्यानी वैद्यनाथाला विधिवत रुद्राभिषेक केला.नंतर भगरे गुरुजींचे शहरात विविध ठिकाणी जल्लोषात स्वागत केले गेले. पं.भगरे गुरुजी यांनी प्रभू वैद्यनाथाला सपत्नीक रुद्राभिषेक व आरती केली. यावेळी रंग माझा वेगळा या मालिकेत भूमिका साकारणारी त्यांची कन्या अनघा भगरे हीने देखील प्रभू वैद्यनाथाची पूजा केली. या अभिषेकाचे पौरोहित्य पुरुषोत्तम चोथवे, दत्तात्रय जोशी यांनी केले. दरम्यान वेध भविष्याचा या कार्यक्रमाच्या माध्यमातून अनेकांच्या भविष्याचा अचूक वेध घेणारे भगरे गुरुजी यांच्यासोबत अनेकांना फोटो काढण्याचा मोह आवरला नाही. दरम्यान, श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंग दर्शनानंतर भगरे



गुरुजी यांचे अंबेवेस मधील श्री काळारामाचे दर्शन घेतले यावेळी प्रताप धर्माधिकारी, गणेश टिंबे, चारुदत्त करमाळकर, विशाल ताथोडे, दयानिधी खिस्ते,प्रशांत पोहनेकर यांनी शाल श्रीफळ देऊन स्वागत केले. तद्नंतर एकादशी निमित्त धरणीधर वाडा येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात जाऊन दर्शन घेतले. ***

# एन.एम.एम.एस.शिष्यवृत्ती परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा न्यू हायस्कूल शाळेत सत्कार

परळी वैद्यनाथ (बातमीदार):- एन.एम.एम.एस.शिष्यवृत्ती परीक्षेत येथील उर्जानगर वसाहतीतील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या न्यू हायस्कूल शाळेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

गेल्या डिसेंबरमध्ये ही परीक्षा झाली होती. या परीक्षेत न्यू हायस्कूल शाळेतील शुभम ओमप्रकाश कोटलवार, अश्विनी राधाकृष्ण तोरडमल हे विद्यार्थी यशस्वी होवून शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत. त्यांच्या या यशाबद्दल शाळेच्या वतीने मुख्याध्यापक बी.ए.नाईकनवरे, पर्यवेक्षक बालासाहेब राठोड व शिक्षकवृंदांनी यशस्वी




विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा सत्कार करुन शुभेच्छा दिल्या. यावेळी शिष्यवृत्ती विभाग प्रमुख संजय वानखेडे यांच्यासह जेष्ठ शिक्षिका हाके मॅडम, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक डी.जी.शिंदे, जेष्ठ शिक्षक रघुनाथ भोसले, संजय सुरवसे, घोडके मॅडम, काटकर मॅडम, भोसले मॅडम, जाधव मॅडम यांच्यासह इतर शिक्षक, कर्मचारी यावेळी उपस्थित होते. दरम्यान, यशस्वी विद्यार्थी व त्यांच्या पालकांचे शालेय समितीचे अध्यक्ष श्री नानासाहेब सोळंके व इतर सदस्यांनी कौतुक केले आहे. ***

# प्रदीप कुलकर्णी यांची नवीन कादंबरी प्रकाशनाच्या मार्गावर

माजलगाव (बातमीदार):- येथील सुप्रसिद्ध साहित्यिक तथा संपादक प्रदीप कुलकर्णी यांची ''प्रेमात पडायचे होते पण'' ही नवीन कादंबरी बेंगलोर येथील प्रतिलिपी च्या वतीने लवकरच प्रकाशित होणार असून वाचकांना ती अॅमेझॉन वर खरेदी साठी उपलब्ध असणार आहे.

माजलगाव जिल्हा बीड येथील माजलगाव परिसर या वृत्तपत्राचे संपादक तथा सुप्रसिद्ध लेखक प्रदीप कुलकर्णी यांनी आतापर्यंत दहा कादंबऱ्या लिहिल्या असून त्यातील एक निवांत ही कादंबरी पुस्तक रूपाने यापूर्वी १९८४ साली प्रकाशित झाली होती. आता तब्बल चार दशकानंतर त्यांची ''प्रेमात पडायचे होते पण'' ही नवीन कादंबरी लवकरच पुस्तक रूपाने वाचकांच्या हातात पडणार आहे. या कादंबरी साठीची प्रकाशन प्रक्रिया पूर्णपणे पार पडली असून लवकरच या कादंबरीचे प्रकाशन होणार असल्याचे लेखक प्रदीप कुलकर्णी यांनी सांगितले. प्रतिलिपी मराठी चे व्यासपीठ मिळाल्यानंतर लेखक प्रदीप कुलकर्णी यांच्या लिखाणाचा वेग वाढला, महत्त्वाचे म्हणजे त्यांना लिखाणाचा छंद हा लहानपणापासून आहे, त्यांच्या अनेक कथा या दिवाळी अंक आणि विविध दैनिकांमध्ये प्रकाशित झाल्या आहेत प्रतिलिपी मुळे त्यांना एक चांगले व्यासपीठ मिळाले, आणि निवांत नंतर त्यांना या व्यासपीठाच्या माध्यमातून प्रेमात पडायचे होते पण ही कादंबरी प्रकाशित करण्याची संधी मिळाली आहे.




प्रतिनिधीच्या अॅपवर त्यांच्या दहा कादंबऱ्या वाचनासाठी उपलब्ध आहेत. पैकी सहा कादंबऱ्या पूर्णपणे प्रकाशित झाल्या असून तीन कादंबऱ्या सध्या प्रतिलिपीवर प्रकाशित होणे चालू आहे. प्रतिलिपीवर त्यांच्या अनेक लघुकथा असून त्यांच्या '' या लघु कथेने तर सर्वाधिक वाचक मिळविण्याचा विक्रम केला आहे. तर 'रंजना' ही कादंबरी देखील वाचकांच्या हृदयावर राज्य करून गेली आहे. अजूनही या कादंबरीला प्रचंड मागणी असून ही कादंबरी वाचणाऱ्यांच्या संख्येत अमुलाग्र वाढ होत आहे. सध्या या कादंबरीची वाचक संख्या दीड लाखाच्या जवळपास पोहोचली आहे. प्रेमात पडायचे होते पण, ही कादंबरी देखील त्यांनी प्रतिलिपीवर प्रकाशित केली असून या कादंबरीचे ५४ भाग आहेत ५४ भाग असलेल्या या कादंबरीचे पुस्तक रूपात प्रकाशन होत असून पृष्ठ संख्या ४६४ आहे. या कादंबरीचा विषय प्रेमाचा असला तरी प्रेम करण्याचे वय आणि प्रेम करताना ज्या मर्यादा असतात जे संस्कार घरातून झालेले असतात ते न विसरता या कथा नायकाने आणि कथा नायीकेने आपले वेगळेपण कसे दाखवून दिले ? हे यातून लेखकाने उत्कृष्टरित्या समाजापुढे मांडले आहे. ही कादंबरी नक्कीच वाचकांच्या पसंतीला उतरेल असा आत्मविश्वास लेखक प्रदीप कुलकर्णी यांनी व्यक्त केला आहे.*

## 'फेक न्यूज'ची माहिती देण्यासाठी स्वतंत्र क्रमांक जाहीर

बीड, (जिमाका) : लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या कालावधीमध्ये ३९ बीड मतदारसंघातील 'फेक न्यूज'ची माहिती देण्यासाठी ८७८८९८४९९ हा स्वतंत्र क्रमांक जाहीर करण्यात आला आहे. नागरिकांनी यावर फेक न्युज ची माहिती व्हॉट्सअप करावी. लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा कार्यक्रम जाहीर झाला असून आचारसंहिता लागू झाली आहे. याकाळात उमेदवारांची प्रचारा दरम्यान बदनामी करणे, अफवा पसरविणे, द्वेषपुर्ण संदेश, खोटे संदेश तसेच प्रिंट मिडिया, इलेक्ट्रॉनिक मिडिया, सोशल मिडियाद्वारे प्रसारित होणाऱ्या फेकन्युजची माहिती नागरीकांकडून मिळण्यासाठी हा ८७८८९८४९९ स्वतंत्र मोबाईल क्रमांक माध्यम प्रमाणिकरण व संनियंत्रण समिती आणि मीडिया कक्षाकडून जाहीर करण्यात आला आहे. या क्रमांकावर व्हॉट्सअप करावे. **

# बँक कॉलनीत बोरला आले गरम पाणी..!

परळी (प्रतिनिधी):- परळी शहरातील बँक कॉलनी परिसरात शिवाजी फड यांच्या बोरवेलला दि.१० एप्रिल २०२४ रोजी पासून अचानकपणे गरम पाणी येत आहे. बोरवेल सुरू केले असता थोडे थंड पाणी येते त्यानंतर पाण्याचे तापमान वाढत जाऊन पाणी गरम होत जात आहे. सदरील प्रकारामुळे फड कुटुंबीय चिंतेत असून सदरील पाण्याचे नमुने हे प्रशासनाने तात्काळ तपासणीसाठी पाठवावेत अशी मागणी फड यांनी केली आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की,परळी येथील शिवाजी फड यांच्या बोरिंगमधून काही दिवसापासून गरम पाणी येत आहे. या पाण्याचे गरम होण्याचे प्रमाण वाढत चालल्याने चिंतेचा विषय बनत चालला असून भीतीचे सावट निर्माण होत आहे. परिसरात हा चर्चेचा विषय बनला असून कुतूहल निर्माण होत आहे. सदरील बोरवेल हा २१० फूट असून १७० फुटापर्यंत पाईप टाकलेले आहेत. या भागातील अनेक बोरवेल बंद असल्याचेही समजते. याबाबत परळी तहसील प्रशासनाचे नायब तहसीलदार बी. एल. रुपनर यांना याविषयी माहिती दिली. भूगर्भ तज्ञांकडून याची शहानिशा करण्यात यावी, पाण्याचे नमुने तपासणीसाठी घेण्यात यावेत अशी मागणी शिवाजी फड कुटुंबीयांनी केली आहे.

दरम्यान गुढीपाडव्याच्या दिवशी मेघगर्जनीसह विजाचा कडकडाट होऊन



जोरदार पाऊस परळी परिसरात झाला होता. तेव्हापासून आमच्या बोरवेलला गरम पाणी येत आहे. गरम पाणी येत असल्याने आमचे कुटुंबीय चिंतेत आहे. प्रशासनाकडे याकडे लक्ष देऊन तात्काळ उपाययोजना करावी अशी आमची मागणी असल्याचेही फड कुटुंबीयांनी सांगितले.

**गरम पाण्याचे झरे आहेत का?**

गरम पाण्याचे झरे आहेत का? तसाच प्रकार असावा किंवा भूगर्भात फॉस्फरसचे प्रमाण असल्यामुळे काही प्रमाणात गरम पाणी येत असल्याची संभावना जाणकारातून व्यक्त होत आहे. परळी प्रशासनाकडून अद्याप सदरील बोरवेलची पाहणी करण्यात आली नाही. प्रशासनाने त्वरित सदरील बोरवेलची पाहणी करून पाण्याचे नमुने तपासणीसाठी पाठवावेत अशी मागणी फड कुटुंबीयांच्या वतीने करण्यात येत आहे. ***

संपादकीय...

# गावगंगेचा कोंडमारा....

-० सुविचार ०-
उत्तम स्वभाव आणि प्रामाणिकपणा
हे माणसाचे कधीही न संपणारे धन आहे.

परळी शहराच्या मधोमधून वाहणारी गावगंगा म्हणून 'सरस्वती नदी' ओळखली जाते. या नदीला मोठे धार्मिक, पौराणिक महत्व आहे. 'परळी महात्म्य' या ग्रंथात काही धार्मिक कथाही या नदीशी संबंधित आहेत. अंबेवेशीत या नदीकाठावर जुने श्री शनी मंदिर, श्री विठ्ठल मंदिर, श्रीराम मंदिर आहे. शिवरात्रीवेळी श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाची पालखी मिरवणूक अंबेवेशीत आल्यानंतर शोभेची दारू येथे नदीपात्रात उडवण्याची प्रथा आहे.

अशीही पुराणकाळापासून परळीतून वाहणारी सरस्वती नदी. तिचा उगम परळी शहराच्या दक्षिणेला श्री वेताळ मंदिर परिसरातील एका डोंगर कुशितून होतो. गोमुखातून निघणारी ही नदी परळीच्या गावभागातून वाहत पुढे संगम या गावाच्या परिसरात ब्रम्हनदीला मिळते. कधीकाळी परळीकरांची पिण्याच्या पाण्याची, सांडपाण्याची गरज ही नदी भागवत असे. पूर्वी ती बारमाही वाहत होती असे लोक म्हणतात. कालौघात पाऊस काळ कमी होत गेल्याने तिचे बारमाही वाहणे थांबले आहे.

परळीची गावगंगा असणाऱ्या या नदीचे आज सगळे रूपच पालटले आहे. परळीचे पहिले नगराध्यक्ष कै.लक्ष्मणराव देशमुख यांच्या कारकीर्दीत ६५-६७ वर्षापूर्वी या नदीवर अंबेवेस भागात केवळ आठशे रूपये खर्च करून परळीतला पहिला पूल बांधला गेला. पुढे तत्कालीन नगराध्यक्ष गुरूलिंगअप्पा मेनकुदळे यांच्या काळात आजच्या मिलिंद शाळेजवळचा पूल बांधला. वाढत्या लोकसंख्येबरोबर वाढत्या वस्त्यांमुळे सांडपाण्याची समस्या वाढू लागली. या नदी परिसरातील विविध गल्ली बोळातून वाहणारी गटारे व त्या गटारातील घाण पाणी या नदीला येऊन मिळू लागले. पुढे हे गटाराचे पाणी, घाण, कचरा या नदी पात्रात वाढतच गेला. कत्तलखाण्यातील घाण, कचरा या पात्रात सोडल्याने नदीला गटार गंगेचे स्वरूप आले आहे. पवित्र सरस्वती नदी 'गेंडी' या नावाने ओळखली जाऊ लागली. पैशाचा हव्यास, वाढते शहरीकरण, वाढती लोकसंख्या यामुळे या नदी पात्राच्या काठावर काही ठिकाणी नदी पात्रातही घरे बांधून लोक राहू लागले. अंबेवेस, मिलिंद शाळेजवळ तर या नदी पात्रातच मोठे व्यापारी संकुल बांधले गेले. अलिकडच्या काळात तर गाव भागात जमा होणारा सुका, ओला कचराही या नदीपात्रात रिचवला जाऊ लागला. या सर्व प्रकाराने नदीपात्र अरूंद होत जाऊन आज त्याला छोट्या ओढ्याचे, गटाराचे स्वरूप आले आहे. परळी परिसरात मुसळधार पाऊस झाल्यास या नदीपात्रात पाणी तुंबण्याचा, पुलावरून वाहण्याचा प्रकार घडतो. यामुळे अंबेवेशीतून गावभागात जाणे अवघड होऊन बसले होते. अंबेवेशीत श्री शनि मंदिराच्या पायथ्याशी तर दुसऱ्या बाजुला राम मंदिराच्या भिंतीपर्यंत पुराचे पाणी जाते. यामुळे काहीच्या घरात, दुकानात पाणी शिरते, मोठे नुकसानही होते. या नदीचा विविध कारणामुळे झालेला कोंडमारा, कोंडलेला श्वास या प्रकारास कारणीभूत आहे.

दरम्यान, शहरातील स्वच्छतेची जबाबदारी असलेल्या परळी पालिकेचे सरस्वती नदीच्या स्वच्छतेकडे पूर्णपणे दुर्लक्ष आहे. हे नदीपात्र स्वच्छ रहावे म्हणून कोणतीही उपाययोजना पालिकेकडून केली जात नाही, उलट शहरात गावभागात जमा होणारी घाण, गटारातील मैला संबंधित बऱ्याचवेळा नदीपात्रात टाकून नदीपात्रात घाणीचे साम्राज्य निर्माण करण्यास कारणीभूत ठरत आहेत. पालिकेच्या अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देवून सरस्वती नदी स्वच्छ करण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे, शिवाय ही नदी स्वच्छ रहावी यासाठी कायम लक्ष दिले पाहिजे अशी लोकभावना येथे आहे. नदीपात्रात घाणीचे साम्राज्य वाढल्याने परिसरात राहणाऱ्या नागरिकांना दुर्गंधीचा सामना करावा लागतो आहे, शिवाय डास, माशा मोठ्या प्रमाणात होतात, यामुळे या भागात रोगराईला निमंत्रण मिळते आहे.

सरस्वती नदीला गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी आता परळीतील जाणकार, सामाजिक कार्यकर्ते, पर्यावरणप्रेमी यांनी पुढाकार घेण्याची गरज आहे. सरस्वती नदी स्वच्छ मोहिम हाती घेण्याबरोबरच नदीपात्रात घाण, कचरा, गटाराचे पाणी सोडण्यावर कडक बंधने घालणे गरजेचे आहे. नदीपात्रात व काठावर दिवसेंदिवस वाढत चाललेली बांधकामे, अतिक्रमणे थांबली गेली पाहिजेत. शिवाय ती काढलीही गेली पाहिजेत, अंबेवेशीतील या नदीवरील पूल नव्याने बांधून उंची वाढवली गेली पाहिजे. अशा विविध उपाययोजना झाल्यातरच 'सरस्वती नदी' चा जीव गुदमणार नाही, तिचा कोंडमारा होणार नाही, पुन्हा ती पूर्वीप्रमाणे आनंदाने वाहू लागेल. ***

# सक्षम लोकशाहीसाठी मतदारांचे अधिष्ठान...

भारत निवडणूक आयोगातर्फे देशात मध्यावधी निवडणूक कार्यक्रम घोषित करण्यात आला आहे. सर्वात मोठी आणि सक्षम लोकशाही आपला भारत देशाची जगात असणारी ओळख. निवडणुकीची होणारी ही सर्व प्रक्रिया मतदार केंद्रित आहे याबाबत विशेष लेख.

निवडणूक आयोग ही स्वतंत्र व सार्वभौम व्यवस्था आहे या आयोगाकडे स्वतःचे असे मनुष्यबळ मर्यादित स्वरूपाचे आहे त्यामुळे देश स्तरावर सर्व शासकीय प्रशासन यंत्रणेचा वापर करण्याचा अधिकार आयोगास प्रदान करण्यात आला आहे. या यंत्रणेच्या माध्यमातून राज्य पातळी ते गाव पातळीवर असलेल्या प्रत्येक मतदान केंद्रात नियुक्ती झालेले कर्मचारी हे काम करतात त्या सर्वांना या कामासाठी प्रशिक्षित करणे त्यासोबत राजकीय पातळीवर उमेदवारांच्या आणि पक्षांच्या कामकाजाची नोंद ठेवणे आणि सुरळीतपणे निवडणूक घेण्यासोबतच त्यानंतर मतमोजणी यंत्रणेमार्फत नवे प्रतिनिधी घोषित करणे येथे पर्यंत पूर्ण प्रक्रिया आयोग सक्षमपणे करते.

लोकशाहीत मतदार म्हणून मिळालेला हक्क बजावण्याची जबाबदारी प्रत्यक्ष मतदाराची आहे. यासाठी अगदी मतदाराच्या वार्डमध्ये जवळच्या अंतरावरही मतदान केंद्र उभी करण्यात येतात या केंद्रापर्यंत जाऊन मतदारांनी मतदान करण्याची आवश्यकता आहे.

आपल्या सर्वात मोठी लोकशाही असणाऱ्या या देशात सध्या मध्यवर्ती निवडणूक कार्यक्रम जाहिर झाला आहे यात आपण मतदाराला मतदार राजा म्हणतो याचं कारण अर्थातच लोकांचे प्रतिनिधित्व करणार सरकार हे लोकांसाठीच राज्य चालवता या लोकशाहीर रचनेत सरकार स्थापन करण्यासाठी प्रतिनिधी निवडून देण्याचं मुख्य काम निवडणूक प्रक्रियेद्वारे होत असते आणि ही संपूर्ण प्रक्रिया ज्याच्याभोवती केंद्रित आहे ते म्हणजे मतदार आणि म्हणूनच आपण मतदाराला राजा असं म्हणतो.

लोकांनी लोकांचे प्रतिनिधी निवडताना या पद्धतीचा अधिकार कोणाला द्यायचा याचा जगभरातील इतिहास अतिशय रंजक आहे कधीकाळी केवळ अमीर उमराव यांना मतदानाचा अधिकार होता त्या काळापासून पुढे सर्वांना सरसकट मतदानाचा अधिकार मिळेपर्यंत बऱ्याच घडामोडी झालेल्या आहेत अनेक ठिकाणी त्या त्या देशांच्या घटनेत महिलांना मतदानाचा अधिकार नव्हता आणि त्यासाठी त्यांना आंदोलने करावी लागली आणि मतदान करण्याचा अधिकार म्हणून सिद्ध आणि प्राप्त करून घ्यावा लागला मतदानाचा हा प्रवास लक्षात घेता आपल्या देशातील लोकशाही अतिशय सक्षम अशी लोकशाही आहे असेच म्हणता येते आपल्या देशात महिला, पुरुष असा भेदभाव न करता २१ वर्षे वय पूर्ण झालेल्या प्रत्येक नागरिकास मतदान करण्याचा अधिकार देशातील पहिल्या मध्यावधी निवडणुकीतूनच प्राप्त झालेला होता, त्यानंतरच्या काळात सज्ञान व्यक्तीच्या सहभागाचे महत्त्व लक्षात घेऊन त्यात बदल करण्यात आलेले आहेत.

ज्याला आपण ६१ वी घटनादुरुस्ती म्हणतो त्या घटनादुरुस्ती मधील कलम ३२६ अंतर्गत मतदाराचे वय २१ वरून १८ करण्यास २८ मार्च १९८९ रोजीच्या दुरुस्तीद्वारे समिती प्रदान करण्यात आली. नागरिकास सज्ञान मानण्याचे वय विविध देशात असणाऱ्या कायद्यान्वये वेगवेगळ्या आहे आणि त्यात त्या देशांनी आपापल्या पद्धतीने सुधारणा केल्या त्याच प्रकारे आपल्याकडे या ६१ व्या घटनादुरुस्तीतून प्राप्त झालेला अधिकार आहे याची माहिती नवमतदारांना असलीच पाहिजे. देशात निवडणूक प्रक्रियेच्या अनुषंगाने निवडणुका जाहीर झाल्यावरच काम सुरू होते असे नाही निवडणूक आयोगाचे काम हे सातत्यपूर्ण असे काम आहे नवीन मतदार नोंदणीसाठी प्रतिवर्षी एक जानेवारी हा अर्हता दिनांक गृहीत धरून याद्यांचा विस्तार होतो.

या मतदार याद्यांची दुरुस्ती तसेच शुद्धीकरण आधी कामेही आयोग आपल्या स्तरावर सातत्याने करीत असतो. यासाठी २५ जानेवारी हा दिवस राष्ट्रीय मतदार दिन म्हणून साजरा करण्यासह विविध मोहिमांतून मतदार नोंदणी, वगळणी, सुधारणा याद्यांची प्रसिद्धी, आक्षेप व हरकती मागविणे,आलेल्या सर्व आक्षेप व हरकतींचे निरसन करणे आदी कामे अव्याहतपणे सुरू असतात आणि या सर्वांचे केंद्रस्थान अर्थात मतदार आहे.

आपल्या असेतु हिमाचल विस्तार असलेल्या देशात निवडणूक कार्यक्रम हेच मुळात एक मोठे आव्हान आहे. वाढत्या लोकसंख्येसोबत प्रत्येक निवडणुकीत पात्र मतदारांची संख्या वाढताना आपणास दिसते. या सर्व पात्र मतदारांच्या नोंदणी ते मतदानाचे नियोजन देशपातळीवर आयोग करते. जगातली सर्वात मोठी लोकशाही आपण आहोत यावर मतदार म्हणून शिक्कामोर्तब करण्यासाठी प्रत्येक मतदाराने मतदानाचा प्राप्त हक्क आपला राष्ट्रीय कर्तव्य म्हणून बजावले पाहिजे.

**- प्रशांत दैठणकर**
जिल्हा माहिती कार्यालय, बीड


# यशाची गुरुकिल्ली....

आपल्या प्रत्येकाच्या जीवनात काहीतरी ध्येय ठरलेले असते ; ते साध्य करण्यासाठी प्रथमतः आपल्यातील कुवत व तिच्या मर्यादा जाणून घेणे अतिशय आवश्यक असते. अशी जाणीव म्हणजे असमर्थता नव्हे, याचेही भान ठेवले पाहिजे; कारण प्रत्येक व्यक्तीत अंगभूत शक्ती असतात. त्यांचे स्वरूप व मर्यादा समजून घेतल्या की यशोमार्गावरील ते पहिले पाऊल ठरते.

जे काम आपण हाती घेतलेले असते, त्यावर पूर्ण लक्ष केंद्रित करणे; त्यासाठी आपली सर्व मानसिक, शारीरिक व बौद्धिकशक्ती पणाला लावून ते काम निष्ठेने करण्यातच सूज्ञपणा असतो व त्यातच यशाची ग्वाहीही असते. अनेकदा माणसे निराश होतात.

पण अशी निराशा त्यांना दुर्बल करत असते व त्या प्रमाणात ती यशापासून दूर जात असतात. तेव्हा अशा निराशेवर मात करून नव्या उमेदीने अधिक चांगल्या गोष्टी करण्याचा निश्चय करून प्रत्यक्ष कृती करण्यास प्रवृत्त झाल्यास त्याचे योग्य ते फळ मिळतेच मिळते.

तेव्हा स्वतःची नीट ओळख करून घेणे, स्वतःच्या सुप्त शक्तीचा योग्य वापर करणे,




स्वतःविषयी चांगला व सकारात्मक विचार करणे आणि कष्ट करण्याची तयारी असणे हीच यशाची गुरुकिल्ली असते.

**- संग्राहक : शाहूराज येवते,**
परळी वैजनाथ.

'परळी परिसर' हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक एस.एल.वाकडे यांनी न्यू सुधांशू प्रिंटर्स, श्रीनाथ चित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड ४३१५१५ (महाराष्ट्र) येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक एस.एल.वाकडे.मो.९४२२३२८४९३. e-mail : parliparisar2017@gmail.com (या साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखास संपादक सहमतच असतील असे नाही.)
RNI No.-MAHMAR/2017/74640 Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25 (सर्व वाद परळी न्यायकक्षेत) www.parliparisar.com
* वर्ष ०७ * अंक ५३ * पृष्ठ संख्या- ४ परळी वैजनाथ, जि.बीड (महाराष्ट्र) सोमवार, दि. २२ एप्रिल २०२४ * किंमत : २ रू.

# व्यायाम व संस्कार देशाचे भविष्य घडविणारे शिबीर - प्रा.बाबासाहेब देशमुख

परळी वैजनाथ (प्रतिनिधी) : गेल्या ३४ वर्षापासून श्री हनुमान व्यायाम शाळा व वैद्यनाथ बँक यांच्या संयुक्त विद्यमाने व श्री वैद्यनाथ देवळ कमिटीच्या सहकार्याने आयोजित केलेल्या उन्हाळी व्यायम शिबीर व संस्कार वर्ग शिबीराचे आयोजिन केल्यामुळे देशाचे भविष्य घडविणारे शिबीर म्हणे वावगे ठरणार नाही असे प्रतिपादन श्री वैद्यनाथ देवळ कमिटीचे सचिव प्रा.बाबासाहेब देशमुख यांनी केले. व्यायम शिबीर व संस्कार वर्गाचे आज मान्यवरांच्याहस्ते उद्घाटन झाले या प्रसंगी अध्यक्ष समारोप करताना प्रा.बाबासाहेब देशमुख बोलत होते. या प्रसंगी ते म्हणाले की, आजचा विद्यार्थी हा देशाचे भविष्य घडविणार आहे. त्यासाठी तंदुरस्त व संस्कार होणे गरजेचे आहे. त्या दृष्टिकोणातूनच उन्हाळी व्यायाम शिबीर व संस्कार वर्गाचे आयोजन केले जात आहे. या शिबीराचे उद्घाटन जेष्ठ प्रा.डी.जे. वाघमारे, वैद्यनाथ देवल कमिटीचे विश्वस्थ





प्रा.प्रदिप देशमुख यांच्या उपस्थितीत करण्यात आले. या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून दैनिक जगमित्रचे मुख्य संपादक बालासाहेब कडबाने, हनुमान व्यायम शाळेचे अध्यक्ष दत्ताप्पा गुरूजी, प्रतिष्ठित व्यापारी बंडु गरूड, वैद्यनाथ बँकेचे संचालक प्रकाश जोशी, माजी नगराध्यक्ष वैजनाथ जगतकर, माजी उपनगराध्यक्ष सुरेश टाक, हनुमान व्यायाम शाळेचे सचिव देविदास काळे, ग्राहक मंचाचे चंद्रकातअप्पा शेटे, आडत व्यापारी महादेवअप्पा फडकरी, साखरेअप्पा, सेवानिवृत्त क्रिडा शिक्षक सुभाष नानेकर, सामाजिक कार्यकर्ते अशोकराव स्वामी, सेवानिवृत्त क्रिडा शिक्षक अनंत भातांगळे (जेष्ठ पत्रकार) यांच्यासह आदी मोठ्या संख्येने उपस्थितीत होते. या प्रसंगी मान्यवरांचे स्वागत सेवानिवृत्त क्रिडा शिक्षक अमर देशमुख, प्रा.अतुल दुबे, क्रिडा शिक्षक बाळासाहेब हांगरगे, संजय (पापा) देशमुख, विजय मुंडे, योग शिक्षक बाळासाहेब कराड, चंद्रकांत चाटे, माजी सरपंच शिवशंकर कराड, यशवंत कांबळे, अमित कचरे, माऊली मुंडे (पैलवान), महादेव इटके, विकास हालगे, महात्मा हत्ते, दिंगाबर नागनाळे, विक्रम स्वामी आदिंनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन विलास आरगडे तर अनंत भातांगळे यांनी केले. ***

# खर्च निरीक्षक यांनी घेतली जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांची भेट

बीड, (जिमाका) भारतीय राजस्व सेवेतील सुशांताकुमार बिस्वास हे ३९ बीड लोकसभा मतदारसंघासाठी खर्च निरीक्षक म्हणून काम पाहणार असून त्यांनी जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांची भेट घेतली. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर त्यांच्यासह निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, सहाय्यक निर्णय निवडणूक अधिकारी कविता जाधव, उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्र कुमार कांबळे यांच्यासह अन्य अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. यावेळी त्यांनी ३९ बीड मतदार संघाची माहिती जाणून घेतली. तसेच निवडणुकी संदर्भात खर्च निरीक्षक म्हणून काम करताना कामाच्या स्वरूप कसे असणार आहे याबद्दल सांगितले. शासकीय विश्रामगृह येथे असून त्यांची निवासाची व्यवस्था करण्यात आली असून श्री बिस्वास यांचा संपर्क क्रमांक ९४०४४६०५११ हा आहे. जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रशेखर केकान हे त्यांचे संपर्क अधिकारी म्हणून सोबत असणार आहेत. ***

# पीएच.डी.साठी 'पेट' की 'नेट'? हा एकच सवाल...

पीएच.डी. (Ph.D) करिता विद्यापीठांची पेट (इएढ) ऐवजी नेट (NET) लागू करण्याच्या निर्णयाला तामिळनाडू, कर्नाटक सरकारने कडाडून विरोध केला आहे. विद्यापाठ अनुदान आयोगा (UGC) चा हा निर्णय विद्यापीठांच्या स्वायत्ततेवर घाला घालणारा असल्याचा आरोप स्थानिक सरकारने केला आहे. त्यामुळे येत्या काळात पेट विरूद्ध नेट हा वाद चांगलाच पेटणार आहे. या निर्णयाला देशभरातील उमेदवारांचा देखील विरोध होताना दिसत आहे. काही दिवसांपुर्वी विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) ने पीएच.डी. प्रवेश परीक्षा म्हणून विद्यापीठ स्तरावर घेतली जाणारी 'पेट' परीक्षा रद्द करून केंद्रीय स्तरावर 'नेट' ही परीक्षा बंधनकारक आली आहे. त्यामुळे युजीसीच्या या निर्णयाला देशभरातून विरोध होताना दिसून येत आहे.

पीएच.डी.साठी विद्यापीठ स्तरावर घेतली जाणारी 'पेट' प्रवेश चाचणी रद्द करून केवळ केंद्रीय स्तरावरील 'नेट' (नॅशनल एलिजिबिलिटी टेस्ट) हीच संशोधन करू इच्छिणाऱ्यांसाठी प्रवेश पात्रता परीक्षा म्हणून बंधनकारक करण्याच्या 'विद्यापीठ अनुदान आयोगा'च्या (यूजीसी) निर्णयाला देशभरातून अपेक्षेप्रमाणे विरोध होत आहे.

नेट ही अध्यापनाचे कौशल्य तपासणारी पात्रता परीक्षा आहे. त्यात जनरल स्टडीज आणि विषयाचे ज्ञान तपासणारे असे दोन पेपर द्यावे लागतात, तर पेटमध्ये उमेदवारांचे संशोधनाचे विविध पैलू तपासले जातात. त्यामुळे नेटच्या आधारे संशोधनपात्र उमेदवार ठरविणे अन्यायाचे आहे, असा आक्षेप आहे. दुसरे म्हणजे नेटप्रमाणे राज्याच्या स्तरावर घेतली जाणारी सेट ही परीक्षाही पीएचडीकरिता ग्राह्य धरली जाणार का, हा प्रश्न अनुत्तरितच आहे. केंद्राकडून सातत्याने ज्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० चा दाखला दिला जातो, त्यात विद्यापीठे संशोधनाची केंद्रे व्हावीत, अशी अपेक्षा वर्तवण्यात आली आहे. पण, नेट सक्तीमुळे या संशोधन केंद्रांना प्रवेश परीक्षा ठरवण्याचा अधिकारही नाकारण्यात आला आहे. याच धोरणात शैक्षणिक संस्थांना स्वायत्तता देण्याची गरज व्यक्त होते. त्यानुसार लहानमोठ्या कॉलेजनाही स्वायत्तता दिली जात आहे. स्वायत्त संस्थांना आपली प्रवेश प्रक्रिया, अभ्यासक्रम, अध्ययन-अध्यापनाच्या, मूल्यमापनाच्या पद्धती ठरविण्याला प्रोत्साहन दिले जाते. दुसरीकडे विद्यापीठांवर अविश्वास दाखविला जात आहे.

थोडक्यात केंद्र सरकारच्या भूमिकेतील विरोधाभास यामुळे अधोरेखित होत आहे, असे मत तज्ज्ञांकडून व्यक्त केले जात आहे.

**- डॉ.सिद्धार्थ तायडे,**
परळी वैजनाथ.

# निवडणूक आणि प्रचार : राजकीय पक्षांनी घ्यावयाची खबरदारी

या देशातील प्रत्येक नागरिक हा भारतीय असून भारतीय म्हणून त्याला प्रत्येक निवडणुकीत उभे राहण्याचा अधिकार आहे. यासाठी वयाची २१ वर्ष पूर्ण होणे ही एक अट महत्त्वाची आहे. ज्याला निवडणुकीत उभे राहायचे आहे, असा व्यक्ती स्त्री-पुरुष कोणीही कुठल्यातरी राजकीय पक्षाचा सदस्य असायला हवा अथवा अपक्ष म्हणूनही निवडणूक लढवु शकतो.

जीवन जगत असताना ज्याप्रमाणे आपल्या आयुष्याला आपण काही नियम घालून दिलेले असतात. त्यामुळे आपले स्वतःचे आयुष्य हे सुखकर होत असते. त्याप्रमाणेच निवडणूक लढवितांनाही भारतीय निवडणूक आयोगाने काही बंधने नियम घालून दिलेले आहेत त्याचे पालन आपल्या वैयक्तिक आयुष्यात आणि निवडणूक लढवितांना दोन्ही वेळेस केल्यास फायदाच होतो. सध्या सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीचे वातावरण असल्याने राजकीय पक्षांनी घ्यावयाची काळजी हे महत्त्वाचे आहे. कारण, यावेळी ऐकणारा वर्ग /प्रेक्षक/ नागरिक हा मोठा असतो. त्यामुळे त्याचे पडसाद समाजात सकारात्मक तसेच नकारात्मक ही होऊ शकतात.




म्हणून निवडणूक प्रचार प्रसाराच्या वेळेस राजकीय पक्ष आणि उमेदवारांनी विशेष काळजी घेणे अपेक्षित आहे. कारण, हेच निवडून आलेले लोकप्रतिनिधी भारतीय संसदेत बसून कायद्याचे राज्य चालवितात त्यावेळी त्यांना सर्वसमावेशक विचार करावा लागतो. तीच भावना त्यांनी निवडणुकीच्या काळात पक्षाचे ध्येय धोरणे मांडताना तसेच मतदारसंघातील मुद्दे मांडताना विचारपूर्वक ठेवावी.

निवडणुकीचा प्रचार प्रसार करताना जातीपाती वरून कुठलेही आक्षेपार्य भाषण देता येत नाही. तसेच जातीचा उल्लेख करणे राजकीय पक्षांनी टाळायला हवे. कुठली एक जात श्रेष्ठ आणि कुठली एक जात निम्न असे न बोलता पक्षाचे ध्येय धोरणे अथवा भविष्यात जनतेला आवश्यक असणाऱ्या सोयी सुविधा बद्दल बोलणे जास्त सुसंगत असते.

ज्याप्रमाणे जातीपातीवर बोलणे टाळले पाहिजे त्याप्रमाणेच धर्म द्वेष न करता एखाद्या धर्माला विशेष महत्त्व न देता आपल्या संविधानामध्ये जो सर्वधर्म समभावाचा संदेश आहे तो जोपासणे आणि त्या परीने आपल्या राजकीय पक्षांचा अथवा उमेदवारांनी स्वतःचा प्रचार प्रसार करणे अपेक्षित आहे.

भारतीय घटनेच्या उद्देशिकेत सामाजिक सलोखा पाळणे असे उल्लेखित असून सामाजिक सलोखा असल्यास समाजाची प्रगतीच होते अधोगती होत नाही याचे भान निवडणुकीच्या काळात राजकीय पक्षांनी ठेवल्यास निवडणूक चा हा काळ सर्वांसाठी सुसह्य आणि प्रबोधनाचा ठरेल.

निवडणुकीत उभे राहणारे उमेदवार हे प्रभावी व्यक्तिमत्व असतात. त्यामुळे त्यांचे असंख्य फॉलोवर्स अनुयायी असतात. जे त्यांच्या व्यक्तिमत्त्वामधून बऱ्याच गोष्टी शिकून स्वतःच्या आयुष्यात त्याप्रमाणे वागतात. निवडणुकीत उभे असणाऱ्या उमेदवाराने कायदा व सुव्यवस्था पालन करून त्याप्रमाणे प्रचार प्रसार केला तर आपसूकच त्यांचे फॉलोवर्स अनुयायी देखील त्याचप्रमाणे कायदा व सुव्यवस्था पालन करतील. त्यामुळे या निवडणुकीच्या धामधुमीच्या काळात कायदा व सुव्यवस्थेचे पालन करणे हे प्रत्येक उमेदवाराचे कर्तव्य आहे.

आताचा काळ हा सामाजिक माध्यमाचा काळ आहे. माध्यमांवर लाखो फॉलोवर्स असतात जे आपल्या नेत्याला उमेदवाराला फॉलो करतात या समाज माध्यमांवर एक संदेश खूप मोठी हानी करू शकतो त्याप्रमाणे प्रबोधनही करू शकतो. त्यामुळे सामाजिक माध्यमाचा वापर करताना तो काळजीपूर्वक विशेषतः निवडणुकीच्या काळात अधिक जागरूकपणे करणे आवश्यक आहे. जेणेकरून त्याचे कुठलेही वाईट पडसाद उमटणार नाहीत.

निवडणुकीचा काळाचे वातावरण भारावलेले असते त्यामुळे शब्दच्छलाने शब्द भेद तयार होऊन एखादा वाद विकोपाला जाण्याचे नाकारता येत नाही अशावेळी कार्यकर्ता प्रवक्त्यांमध्ये स्पष्टता हवी. अंततः सर्वात महत्त्वाचे म्हणजे निवडणूक ही कोणासाठी आहे निवडणुकीच्या मागचा उद्देश काय आहे मतदान कशासाठी करायला हवे मतदार कोण आहे कारण संपूर्ण निवडणूक ही भारताचे नागरिक म्हणजेच मतदार ज्यांचे वय १८ वर्षे पूर्ण झालेले आहेत असे नागरिक या सर्व प्रक्रियेचा महत्त्वाचा हिस्सा आहेत. त्यामुळे मतदान का करावे यासंदर्भात जागृतीची प्रयत्न राजकीय पक्षांकडून उमेदवारांकडून होणे गरजेचे आहे. मतदार जागृती उपक्रम अधिकाधिक केल्यास मतदानाचा टक्का वाढेल आणि एका चांगल्या लोकशाहीला ते पोषक असे ठरेल त्यामुळे या सर्व निवडणूक प्रक्रियेत राजकीय पक्षाची भूमिका ही महत्त्वाची असून मतदार जागृती त्यांच्या वतीने अधिकाधिक व्हावी असे अपेक्षित आहे.

**- अंजू कांबळे-निमसरकर**
माहिती अधिकारी
जिल्हा माहिती कार्यालय बीड